मोटार अपघात दावा क्र.९/२०२३

उज्वला वि. नामदेव

नि.क्र.३२

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव- सिताराम श्रीहरीराम जाठ,

वय- ४८ वर्षे,

व्यवसाय- पोलीस उपनिरीक्षक, आरपीएफ, सोलापूर विभाग.

राहणार- लातूर

**<u>अर्जदारातर्फे सरतपासणी विधीज्ञ श्री.यु.जी.गवारे यांच्या वतीने</u>**

१. मला आजरोजी असिस्टंट सेक्यूरिटी कमिशनर,सोलापूर यांनी साक्षासाठी पाठविलेले आहे. मला साक्ष देण्यासाठी प्राधिकृत केले असून त्याचे पत्र मी सोबत आणलेले आहे. त्या पत्रावर श्री.दिनेश कनूजिया, असिस्टंट सेक्यूरिटी कमिशनर, यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. पत्रास **नि.क्र.३३** देण्यात येते.

२. मी अमित शर्मा याला ओळखतो. तो आमच्या येथे कॉन्स्टेबल आहे. आता मला साक्षीदार अमित शर्मा यांनी दाखल केलेले सेवाविवरणपत्र दाखविले. ते सेवा विवरणपत्र मधूकर भानुदास सुपनावर यांचे आहे. त्यावर सहा. सुरक्षा आयुक्त यांची स्वाक्षरी आहे. ती स्वाक्षरी कनुजिया यांची आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३४** देण्यात येते. आता मला दाखविलेले कॉल लेटर हे मधूकर सुपनावर यांच्या नावचे आहे. त्यावर सहा.सुरक्षा आयुक्त कनुजिया यांची स्वाक्षरी आहे. ती मी ओळखतो. त्यास **नि.क्र.३५** देण्यात येते.

३. आता मला दाखविलेले सॅलरी स्लीप ही मधूकर सुपनावर याची असून ती डिसेंबर-२०२१ ची आहे. त्यानुसार त्याचा एकूण पगार रू.७०,९९४/- आहे. त्या स्लीपमधील मजकूर बरोबर आहे. त्यावर सहा.सुरक्षा आयुक्त कनुजिया यांची स्वाक्षरी आहे. त्यास **नि.क्र.३६** देण्यात येते.

**मोटार अपघात दावा क्र.९/२०२३**

**उज्वला वि. नामदेव**

**नि.क्र.३२**

<u>**गैरअर्जदार क्र.३ तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.एस.जी.दिवाण यांच्या वतीने**</u>

४. मी आरपीएफ मध्ये उपनिरीक्षक या पदावर काम करतो. मी सॅलरी स्लीपमधील नमूद माहिती विस्तृत करू शकतो. नि.क्र.३६ मध्ये TRAN ALL याचा संदर्भ ट्रान्सपोर्ट अलाउन्ससाठी आहे. त्याची रक्कम ही ठरलेली असते. TRAV ALL हा ट्रॅव्हलिंग अलाउन्स आहे. हा अलाउन्स हा डयुटीसाठी बाहेर गेल्यास लागू होतो. त्याची रक्कम बाहेर केलेल्या डयुटीनुसार बदलत राहते. R-M-ALL हा राशन मनी अलाउन्स आहे. त्याची रक्कम ही ठरलेली असते. हे म्हणणे खरे आहे की, सॅलरी स्लीपनुसार वजावटीच्या रक्कमेमध्ये रू.४,४७६/-ही आयकरासाठी, रू.२००/- महाराष्ट्र शासन व्यवसाय करासाठी कपात झालेली आहे. नेट पे रू.५९,५७५/-ही आहे. कार्यालय अभिलेखानुसार त्याची जन्म तारिख ०३/०२/१९८२ आहे. त्याचे निवृत्तीचे वय ६० वर्षे आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2026.02.13 18:02:15 +0530

(पी.पी.केस्तीकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व
पदसिध्द सदस्य,मो.अ.दा.प्रा.,
लातूर

दि.१३/०२/२०२६